# कापुरबावडी वाहतूक उप विभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८४ /२०२५ दि. २५ /०४/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कापूरबावडी वाहतुक उपविभागाचे हद्दीत रिलायन्स ॲस्टलडी लि. कंपनीतर्फे मेट्रो क्र.४ चे काम करण्यात येत असुन रवि स्टील नाका येथील पेट्रोलपंपा जवळील कॅपीटल हॉटेल ते तत्वज्ञान विद्यापीठ दरम्यान पिलर क्रमांक १०,१०,१२ व १३ वरती क्रेनच्या सहाय्याने सिमेंट गर्डर टाकण्यात येणार आहेत. मेट्रो पिलरवरील गर्डर बसविणे करीता वापरण्या येणाऱ्या क्रेन ठाणे–घोडबंदर–भिवंडी वाहीनीवरील मुख्य रस्त्यावर उभ्या कराव्या लागणार आहेत. त्यामुळे सदर मार्गावरुन जाणारी सर्व प्रकारची वाहतुक पुर्णपणे बंद करावी लागणार असुन सदर मार्गावरील वाहतूक इतर पर्यायी मार्गाने वळवावी लागणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई ठाणे कडुन घोडबंदर अथवा कापुरबावडी सर्कल मार्गे भिवंडीला जाणाऱ्या सर्व प्रकाच्या वाहनांना **ज्युपिटर वाय जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदर मार्गावरुन जाणारी सर्व प्रकारची वाहने ही माजीवाडा ब्रिज – ज्युपिटर वाय जंक्शन येथुन उजवे बाजुस वळण घेवुन मुंबई नाशिक महामार्गावरुन खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंबई ठाणे कडुन ज्युपिटर हॉस्पीटल समोरील स्पील रोडने घोडबंदर अथवा कापुरबावडी सर्कल मार्गे भिवंडी दिशेला जाणाऱ्या सर्व प्रकाच्या वाहनांना **गोल्डन क्रॉस** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही गोल्डन क्रॉस येथुन उजवे बाजुस वळण घेवुन गोल्डन नाका मार्गे मुंबई नाशिक महामार्गावरुन खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) ठाणे गोकुळनगर कडुन कापुरबावडी सर्कल मार्गे घोडबंदर अथवा भिवंडी दिशेला जाणाऱ्या सर्व प्रकाच्या वाहनांना **गोल्डन नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही गोल्डन नाका येथुन उजवे बाजुस वळण मुंबई नाशिक महामार्गावरुन खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

१) दि. २५/०४/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दि. २६/०४/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
२) दि. २६/०४/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दि. २७/०४/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
३) दि. २७/०४/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दि. २८/०४/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
४) दि. २८/०४/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दि. २९/०४/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
५) दि. २९/०४/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दि. ३०/०४/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो
६) दि. ३०/०४/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दि. ०१/०५/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजेपावेतो

सदरची वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CS CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उप विभाग.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CS CamScanner